


दैनिक

# अक्षराज

अचूक वेध, अचूक बातमी

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ११०, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०३ डिसेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

# स्थानिक निवडणूक नियोजनातल्या गोंधळावर नाना पटोलेंचा संताप

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०२, नागपूर :** राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत निर्माण झालेल्या घोळावरून काँग्रेसने सरकार आणि निवडणूक आयोगावर जोरदार टीकास्त्र सोडले आहे. मतदारांमध्ये निमर्ण झालेला मनस्ताप आणि निवडणूक प्रक्रियेत झालेल्या अव्यवस्थेसाठी निवडणूक आयोगच जबाबदार असल्याचा आरोप करत काँग्रेस नेते नाना पटोले यांनी निवडणूक आयुक्तांविरोधात महाभियोग आणण्याची मागणी केली आहे. यासाठी विशेष अधिवेशन बोलावण्याचीही मागणी त्यांनी केली.



नाना पटोले म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस स्वतः म्हणतात की निवडणूक आयोगाची अशी प्रक्रिया पहिल्यांदाच पाहतो आहे. मुख्यमंत्रीच हे मान्य करत असतील, तर राज्यघटनेच्या कलम २४३ नुसार निवडणूक आयुक्तांवर महाभियोग आणला पाहिजे. आम्ही पूर्ण पाठिंबा देऊ. आम्हालाही ही प्रक्रिया पहिल्यांदाच पाहायला मिळत आहे. जर सरकारने महाभियोग आणण्याची इच्छाच दाखवली नाही तर निवडणूक आयोगाच्या मागे सरकारच आहे, असा संशय जनतेमध्ये निर्माण होणे साहजिक ठरेल. लोकशाहीचा दिवसाढवळ्या गळा घोटण्याचा प्रयत्न केला जात आहे. निवडणूक आयोग लोकशाहीचा खून करत आहे, असा तीव्र आरोप त्यांनी केला. त्यामुळे जनतेमध्ये प्रचंड रोष असून विरोधी पक्ष म्हणून आम्ही आवाज उठवत असल्याचे पटोले यांनी स्पष्ट केले. निवडणुकीतील गैरप्रकारांवरूनही त्यांनी सत्ताधारी भाजपवर निशाणा साधला. अनेक ठिकाणी प्रचंड प्रमाणात पैसे पकडले गेल्याचा दावा करत ते म्हणाले, निलेश राणे यांनी भाजपचे पैसे पकडून दिले, भाजपने शिवसेनेचे पैसे पकडून दिले. बूथवर खुलेआम पैसे वाटण्यात आले. शाहू-फुले-आंबेडकरांच्या महाराष्ट्रात मतदान विकत घेण्याचा प्रकार कधीच झाला नव्हता. पण यंदा महाराष्ट्राची मती करण्याचे काम सत्ताधाऱ्यांनी केले आहे. ओबीसी आरक्षणाच्या प्रश्नावरही पटोले यांनी सरकारला जाब विचारला. देवेंद्र फडणवीस २४ तासांत ओबीसी आरक्षण परत देऊ म्हणाले होते, पण आजतागायत काहीही झाले नाही. घाई-गडबडीत निवडणुका जाहीर केल्या, आरक्षणाचा नीट अभ्यास केला नाही. त्यामुळे काही ठिकाणी ओबीसी आरक्षण ५० टक्क्यांपुढे गेले आणि आरक्षणाचा गोंधळ झाला. महाराष्ट्राचे वस्त्रहरण केले गेले, अशी टीका त्यांनी केली.


पुणेतील फुरसुंगी येथे झालेल्या राड्यानंतर राज्यातील कायदा-सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असल्याची टीका काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केली. सत्ता पक्षाचे आमदार गुंडगिरी करत असून सरकार गुन्हेगारांना पाठीशी घालत आहे. संतोष देशमुख प्रकरणासारखे अनेक प्रकार महाराष्ट्रात होत आहेत, असे त्यांनी म्हटले.

तसेच, निवडणुकीच्या निकालाची मतमोजणी पुढे ढकलल्याने ईव्हीएम सुरक्षेवर गंभीर शंका निर्माण झाल्याचे पटोले म्हणाले. उद्या निकाल झाले असते तर काँग्रेसच सर्वात मोठा पक्ष ठरला असता. सरकार त्यांच्या ताब्यात असताना आता सर्व काही संशयास्पद आहे, असा आरोप त्यांनी केला.

---

## पिंपळगाव बसवंत महाविद्यालयाच्या बसला भीषण अपघात; १२ जण जखमी

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**



**दि.०२, विंचूर (नाशिक) :** स्वर्गीय बी. पी. पाटील ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, पिंपळगाव बसवंत (ता. निफाड, जि. नाशिक) येथील इयत्ता ११ वीचे ५० विद्यार्थी शैक्षणिक सहलीवरून मालवण येथून परत येत असताना आज पहाटे मोठा अपघात घडला. एम.एच. ०४ जी.पी. ०९२० या क्रमांकाची बस वाठार गावाच्या हद्दीत, राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वर रस्ता दुरुस्तीतील नालीत कोसळली. अपघात पहाटे ६.४५ च्या सुमारास झाला.या भीषण अपघातात एकूण १२ विद्यार्थी व कर्मचारी जखमी झाले असून त्यांच्यावर कराड येथील कृष्णा हॉस्पिटल (मलकापूर) येथे उपचार सुरू आहेत. बसचे चालक भारत संभाजी थेटे होते.

**जखमींची यादी...**

आहेर प्रज्वल दिगंबर, पाचोरकर ऋषिकेश विठ्ठल, सार्थक संजय चव्हाण, आदित्य लक्ष्मण शेजवळ, साहील किरण मोगल, पियुष काळे, वेदांत विलास शिंदे, कल्पना सोमनाथ गिरे, चिन्मय विलास मोरे, संगिता गोरख ढगे, भगवान विजय साळवे, सिकंदर बाबालाल शेख.इतर विद्यार्थ्यांनाही किरकोळ दुखापती झाल्या असून सर्वजण वैद्यकीय देखरेखीखाली आहेत.

**घटनास्थळी तातडीची मदत अपघातानंतर लगेचच...**

कराड (दक्षिण) विधानसभा सदस्य व कृष्णा अभिमत विद्यापीठाचे कुलपती डॉ. सुरेश भोसले, उपविभागीय अधिकारी कराड, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसिलदार कराड यांनी स्थल व रुग्णालयाला भेट देऊन आवश्यक मदत केली. निफाडचे आमदार दिलीप बनकर तसेच प्रांताधिकारी शशिकांत मंगरूळे व तहसिलदार विशाल नाईकवाडे सतत संपर्कात राहून मदतकार्य करत आहेत.

**विशेष मदत कक्ष सुरू...**

तहसील कार्यालय, कराड येथे अपघातग्रस्तांसाठी विशेष मदत कक्ष सुरू करण्यात आला आहे. संपर्क क्रमांक : ०२१६४-२२२२१२

**अतिरिक्त मदत संपर्क :**

विजय कणसे, वैद्यकीय अधिकारी, कृष्णा हॉस्पिटल : ०२१६४-२४१५५५ ते ५८
बाबुराव राठोड, निवासी नायब तहसीलदार : ९४०३६६३२७१
महेश पाटील, मंडळाधिकारी मलकापूर : ९९२२९५५१५५

---

## दिव्यात परप्रांतीयाने केली तरुणाची हत्या; दिवा मनसे आक्रमक




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०२, दिवा (ठाणे) :** मनसे नेते राजुदादा पाटील यांच्या सूचनेनुसार आणि दिवा शहर अध्यक्ष तुषार भास्कर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मनसे दिवा शहर च्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस अधिकाऱ्यांची दिवा पोलिस चौकी येथे भेट घेतली. यावेळी दिवा शहरातील वाढती गुन्हेगारी, शाळा कॉलेजच्या बाहेर मुलींची छेड काढणारे टवाळखोर, रात्री उशिरा पर्यंत सुरू राहणारे अमली पदार्थांची दुकाने, गर्दुल्यांचा असलेला वावर, बांगलादेशी आणि रोहिंग्यो फेरीवाले यांच्यावर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. ८ दिवसात यावर कारवाई न झाल्यास दिवा शहरात बंद पुकारण्याचा इशारा दिवा मनसेने दिला आहे.

---

## नगरपरिषद व नगरपंचायत निवडणुकांची मतमोजणी २१ डिसेंबरला !

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.०२, ठाणे :** राज्यातील २४६ नगरपरिषद व ४२ नगरपंचायतींसाठी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी दि.०२ डिसेंबर २०२५ रोजी मतदान आणि दि.०३ डिसेंबर २०२५ रोजी मतमोजणी नियोजित होती परंतु मा. मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ येथे दाखल झालेल्या रिट याचिकेच्या सुनावणीमध्ये देण्यात आलेल्या निर्णयानुसार दि.३ डिसेंबर २०२५ रोजी होणारी मतमोजणी ही आता दि. २१ डिसेंबर २०२५ रोजी करावी व तसा निकाल घोषित करावा, असे न्यायालयाचे आदेश आहेत. तसेच न्यायालयीन अपील दाखल झाल्याने बाधित झालेल्या नगरपरिषदा/नगरपंचायतींकरिता मतदान दि.२० डिसेंबर २०२५ रोजी तर मतमोजणी दि.२१ डिसेंबर २०२५ रोजी नियोजित असल्याची माहिती महाराष्ट्र राज्य निवडणूक आयोगाचे सचिव सुरेश काकाणी यांनी दिली आहे.

नागपूर खंडपीठात दाखल करण्यात आलेल्या रिट याचिकेवर सुनावणी दरम्यान २ डिसेंबर रोजी मुंबई उच्च न्यायालयाने नगरपरिषद/नगरपंचायत निवडणुकांच्या वेळापत्रकात सुधारणा करण्याचे आदेश दिले. याआधी आयोगाने २ आणि ३ डिसेंबर २०२५ रोजी मतदान प्रक्रिया निश्चित केली होती. मात्र न्यायालयाच्या आदेशामुळे संपूर्ण कार्यक्रमात सुधारणा करण्यात आली आहे.

संबंधित सर्व जिल्हाधिकारी व निवडणूक अधिकारी यांना नव्या तारखेनुसार तयारी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

मतदान केंद्रांवरील सुरक्षा आणि व्यवस्थेबाबत स्पष्ट निर्देश राज्य निवडणूक आयोगाने मतदान प्रक्रियेदरम्यान काटेकोर अंमलबजावणीसाठी महत्त्वाचे निर्देश दिले आहेत, ते पुढीलप्रमाणे....




**(१)** दि.०२/१२/२०२५ रोजीचे मतदान पार पडल्यानंतर ईव्हीएम ची योग्य हाताळणी व सुरक्षित साठा ठेवण्याबाबत आयोगाच्या दि.१६/०८/२०१६ च्या आदेशाचे तसेच दि.१४/०२/२०२४ रोजीच्या आदेशान्वये देण्यात आलेल्या सविस्तर सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

**(२)** आयोगाने दि.१४/०२/२०२४ च्या आदेशान्वये गोडाऊनच्या साठवणूक व व्यवस्थापनाकरिता जबाबदार अधिकाऱ्याची नियुक्ती करावी.

**(३)** मतदान यंत्र साठवणूक ठिकाणालगत सुरक्षा उपकरणे (सीसीटिव्ही, सुरक्षा अलार्म सिस्टीम, Exhaust Fan, Fire Extinguisher, Vacuum cleaner) इत्यादी कार्यान्वित असल्याची खात्री करावी. याशिवाय आवश्यक तेथे बॅरेकेटींग करण्यात यावे.

**(४)** मतदान यंत्र ठेवण्यात आलेल्या गोडावूनसाठी २४ तास सशस्त्र चोख सुरक्षा व्यवस्था तैनात असावी. साठवणुकीच्या ठिकाणी केवळ व अधिकृत व्यक्तींनाच प्रवेश देण्यात यावा व अशा प्रवेशाचा तपशिल लॉगबुकमध्ये नोंदविण्यात यावा.

**(५)** दि.२१/१२/२०२५ रोजी मतमोजणी होणार असल्याने, मतदान पूर्ण झाल्यानंतर मतदान यंत्रांवरील ऑन ऑफ स्विच लक्षपूर्वक बंद करणे आवश्यक आहे. संबंधित निवडणूक निर्णय अधिकारी यांनी मतदान यंत्र पेटीत ठेवण्यापूर्वी त्याचा स्विच बंद असल्याचे खात्री करुनच ते पेटीत ठेवण्यात यावे.

तरीही मतमोजणीच्या वेळी Low Battery असा मॅसेज मतदान यंत्र दाखवित असल्यास राज्य निवडणूक आयोगाच्या रानिआ/मनपा-२००५/प्र.क्र.१८/का-५, दि.१३/०६/२००५ च्या आदेशान्वये कार्यवाही करुन मतमोजणी पूर्ण करण्यात यावी.

**(६)** राजकीय पक्षांनी प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधींना गोडाऊन व सुरक्षा व्यवस्थाबाबत अवगत करावे. जेणेकरुन आवश्यकतेप्रमाणे / त्यांच्या मागणीप्रमाणे त्यांना गोडावून सुरक्षेबाबत पाहणी करता येईल. तसेच निवडणूक लढविणारे उमेदवार अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधींना मतदान यंत्र साठवणूकीच्या गोडावूनचे द्वार दिसेल अशा ठिकाणी बसण्यासाठी जागा निश्चित करून द्यावी.

**पूर्वीच्या आदेशांचे पालन सक्तीचे !**

निवडणूक आयोगाने यापूर्वी जारी केलेल्या सर्व सूचना, विशेषत: १६ ऑगस्ट २०१६ आणि १४ फेब्रुवारी २०२४ च्या आदेशांचे तंतोतंत पालन करण्याचे निर्देश दिले आहेत.

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे झाला बदल हे या निवडणुका पारदर्शक आणि कायदेशीर चौकटीत राहून पार पाडण्यासाठी महत्त्वाचे पाऊल असल्याचे मानले जात आहे. नव्या मतदान तारखेप्रमाणे जिल्हा प्रशासन व निवडणूक यंत्रणा जोमाने तयारीला लागली असून नागरिकांनी मोठ्या प्रमाणात मतदान करावे, असे आवाहन राज्य निवडणूक आयोगाकडून व्यक्त करण्यात आली आहे.

---

## बुलडाण्यात पोलिसांच्या तावडीतून बोगस मतदार निसटला

**दि.०२, बुलढाणा :** स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकांची रणधुमाळी महाराष्ट्रात पाहायला मिळत असतानाच बोगस मतदारांमुळे लोकशाहीचा सोहळा म्हणून पाहिल्या जाणाऱ्या या निवडणुकांकडे पाहण्याचा अनेकांचा दृष्टीकोन बदलत आहे. स्थानिक पातळीवरील राजकारणाला दिशा देणाऱ्या या निवडणुकीमध्ये बुलढाण्यातून असाच एक धक्कादायक व्हिडिओ समोर आला आहे.

**हर्षवर्धन सपकाळ काय म्हणाले ?**

बोगस मतदार पकडल्यानंतर शिवसेना शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांचा मुलगा कुणाल गायकवाड याने मध्यस्ती केली. पकडलेल्या शिवसेना कार्यकर्त्याला पळून जाण्यास मदत केली. उपस्थित पोलिसाला देखील शिवीगाळ आणि दमदाटी करताना तसेच बोगस मतदाराचा बचाव करताना कुणाल गायकवाड व्हिडिओमध्ये स्पष्टपणे दिसत आहेत. आमदार पुत्रावर सरकारी कामकाजात अडथळा आणल्या प्रकरणी तसेच बोगस मतदाराला पळून जाण्यास मदत केल्या प्रकरणी गुन्हा दाखल



करण्याची मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केली आहे.

'बुलढाण्यात शिवसेना आमदार संजय गायकवाड यांनी ग्रामीण भागातून लोकांना आणून नगरपालिका निवडणुकीत बोगस मतदान करून घेत आहेत. काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्ते या बोगस मतदारांना पकडून पोलिसांच्या हवाली करत असताना आमदार संजय गायकवाड यांचे पुत्र कुणाल गायकवाड यांनी पोलिसाला शिवीगाळ आणि दमदाटी करून बोगस मतदाराला पळवून लावले. या प्रकरणी कुणाल गायकवाड यांच्याविरोधात बोगस मतदान आणि सरकारी कामात अडथळा आपल्याप्रकरणी तात्काळ गुन्हा दाखल करून त्याला अटक केली पाहिजे, अशी मागणी देखील काँग्रेसकडून करण्यात आली आहे.

**नगरपरिषद-नगरपंचायत निवडणुकांचा निकाल उद्या लागणार नाही...**

राज्यात आज बहुतांश ठिकाणी नगरपरिषद आणि नगरपंचायत निवडणुकांसाठी मतदान होत असून या निवडणुकांचा निकाल उद्या जाहीर होणार होता. मात्र काही नगरपरिषदांच्या निवडणुका लांबणीवर पडल्याने आता निवडणूक निकालही पुढे ढकलण्याचा निर्णय मुंबई हायकोर्टाच्या नागपूर खंडपीठाकडून देण्यात आला आहे. राज्य निवडणूक आयोगाने जिल्हा कोर्टात अपील प्रलंबित असलेल्या किंवा नामनिर्देशन पत्र मागे घेण्यासाठी पुरेसा वेळ न मिळालेल्या ठिकाणी निवडणुका २० डिसेंबरपर्यंत पुढे ढकलल्या आहेत. त्यामुळे या निवडणुकांसाठी मतदान झाल्यानंतर २१ डिसेंबर रोजी मतदान झालेल्या सर्व नगरपरिषद-नगरपंचायतींचे निकाल जाहीर होतील.

## संपादकीय

### अजरामर बहिणाबाई

मराठी साहित्यातील अजरामर कवयत्री बहिणाबाई चौधरी यांचा आज ३ डिसेंबर रोजी ७४ वा स्मृतिदिन. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले. बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फूर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हे ही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले. बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव व मावसभाऊ पितांबर चौधरी यांनी लिहून घेतलेली कविता, गाणी हस्तलिखित स्वरूपात होती. बहिणाबाईंच्या मृत्यूनंतर सोपानदेव यांनी हे हस्तलिखित आचार्य अत्रे यांना दाखवले. आचार्य अत्रे यांनी बहिणाबाईंच्या त्या सर्व कविता वाचल्या आणि उदगारले अहो हे तर बावनकशी सोने आहे! हे महाराष्ट्रापासून लपवून ठेवणे गुन्हा आहे! आचार्य अत्रेंने त्या सर्व कविता आपल्याकडे घेतले आणि ते प्रकाशित करण्याचा निर्णय घेतला. १९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्य संग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवीयत्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी - अहिराणी - खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर - माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण - उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्ये होती. शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा ( मियते ) मिळते भाकर......, खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला......, मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...... धरित्रीले दंडवत..... यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत. महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहेत. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवियत्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभिने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवीयत्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांचा ७४ वा स्मृतिदिन आहे. स्मृतिदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!

# जाणता राजाचा नवा इतिहास..?

जाणता राजा छत्रपती शिवरायांचा नवा इतिहास त्यांच्या इतिहासाचे पुनर्लेखन करणाऱ्या इतिहासाच्या काही नव्या अभ्यासकांनी पूर्वीच्या त्यांच्या चरित्र इतिहासापेक्षा नवे नवे निष्कर्ष काढत त्यांच्या चरित्राची फेरमांडणी सुरू केली आहे. पण आता या साऱ्या शिवचरित्राच्या नव इतिहासकारापेक्षा एकदम वेगळा इतिहास कन्नड साहित्यिक वाय. आर. पाटील यांनी सांगितल्याने बेळगाव आणि सीमा भागातल्या मराठी भाषकात तीव्र संतापाची लाट उसळली आहे. बेळगावच्या कन्नड साहित्य भवनात कर्नाटक राज्य विकास संस्थेच्यावतीने कार्यक्रमात पाटील यांनी आपल्या अकलेचे तारे तोडत छ. शिवाजी महाराज हे कन्नड समाजातले कन्नड वंशाचे होते, असा दावा करीत छ. शिवाजी महाराज हे लिंगायत वंशाचे होते, असा नवा इतिहास सांगून टाकल्याने मराठी भाषकांच्या संतापाचा उद्रेक झाला. प्रसिध्द साहित्यिक रा. चिं. ढेरे यांच्या साहित्याचा चुकीचा संदर्भ देत त्यांनी छ. शिवरायांना कन्नड आणि लिंगायत वंशाचे असल्याचा अजब दावा केला. लिंगायत समाजाचे कुलदैवत श्री शैल्य मल्लिकार्जुन हे श्री



शिवरायांचे कुलदैवत असल्याचा दावा करीत हाच नवा इतिहास सादर करत बेळगावात कन्नड मराठी भाषकांचे बंधुत्वाचे नाते असल्याचे सांगितले. बेळगाव आणि परिसरात सीमा भागात कन्नड भाषकांचेच वर्चस्व असल्याचे समर्थन करण्यासाठी छ.शिवरायांचा हा असा नवा इतिहास सांगत पाटील यांनी नव्या वादाची ठिणगी टाकली आहे.

कर्नाटक राज्यावर छ.शिवरायांचे वडील राजे शहाजी यांचीच राजवट होती. १६३८ ते १६६४ या काळात शहाजी महाराजांची राजधानी बंगळुरू होती. लहानपणी छ. शिवरायांचे बालपण काही वर्षे बंगळुरूमध्ये आपल्या वडिलांच्याकडेच गेले. शहाजी महाराजांच्या नंतर छ. शिवरायांचे सावत्र बंधू व्यंकोजीराजे यांनीही प्रारंभीच्या काळात बंगळुरू शहरातून जहागिरीचा कारभार केला. पुढे त्यांनी तंजावर प्रांत जिंकल्यावर तंजावर ही राजधानी केली. पेशवाईच्या मराठा साम्राज्याच्या काळात थेट बेल्लारीपर्यंत मराठ्यांची सत्ता होती. पेशवा यांचे सरदार त्या भागात राज्यकारभार करत होते. त्या भागातल्या राज्यकारभाराची भाषा मराठीच होती. छ. शिवरायांनी कर्नाटकच्या स्वारीत बदमानी, गजराज हे किल्ले जिंकले तर गजेंद्र गड हा नवा किल्लाही बांधला. कर्नाटकचा काही भाग त्यांनीच स्वराज्यात आणला. कर्नाटकच्या मोहिमेवर असतानाच त्यांनी श्री शैल्य मल्लिकार्जुनाचे दर्शन घेतले आणि अभिषेकही केला. परतताना तिरूपतीच्या श्री व्यंकटेश्वराचेही दर्शन घेतले. छ. शिवरायांचे कुलदैवत तुळजाभवानी आणि त्यांचा वंश मराठा असतानाही पाटील यांनी ते शुध्द कन्नड आणि लिंगायत वंशाचा असल्याचा नवा इतिहास सांगत छ. शिवराय हे कन्नडच असल्याचा केलेला दावा पूर्णपणे खोटा आहे. छ. शिवराय हे संपूर्ण भारत आणि जगाचे दैवत असले तरी याच कर्नाटकात मराठी भाषाद्वेष्टे कर्नाटक सरकार आणि कन्नड चळवळी गारू यासारख्या कन्नड अभिमानी संस्था छ. शिवरायांचा स्वराज्याचा भगव्या झेंड्याचा आणि मराठी भाषेचा आत्यंतिक द्वेष करतात. याच कर्नाटक सरकारने बेळगाव महापालिकेवर फडकत असलेला भगवा झेंडा सक्तीने काढून टाकला. बेळगावात सीमा भागात जय महाराष्ट्र आणि जय शिवराय म्हणणे गुन्हा ठरविला गेला. सीमा भागातल्या मराठी भाषकांवर कन्नड सक्तीचा वरवंटा सक्तीने फिरवणे सुरूच आहे. या पार्श्वभूमीवर पाटील यांनी केलेले वक्तव्य छ.शिवचरित्राची पूर्णपणे मोडतोड करणारे तर आहेच पण त्यांचा अवमान करणारे असल्यानेच महाराष्ट्र सरकारनेही त्याची गंभीर नोंद घ्यायला हवी.

**ह.भ.प.शिवाजी विठ्ठल चौगुले.**
**मु.पो.मासा बेलेवाडी**
**कागल-कोल्हापूर.९८६७७३२५०४**

### जनता..

जनता ही सार्वभौम
निकाल देई निर्भय
लोकशाहीचा पाया
असावे सदैव अभय

बदलून टाकी दिशा
होई अचंबित निर्णय
अकल्पित घडे कधी
चकीत करे परिणय

निर्णया हजारो वाटा
जाणावा खराअन्वय
साक्षीपुरावे असतात
एक दुजांची तन्मय

सत्या भिन्न व्याख्या
समजू घ्यावा आशय
गहनता वाढत जाते
जसा खोल जलाशय

निकाल असा कसा
भलता क्लिष्ट विषय
सर्वांना संतुष्ट ठेवणे
कठीणअसे अतिशय


आम्ही सर्वज्ञ नसतो
जनसामान्याचाविनय
निकालाची योग्यता
रे ठरवू शकतो समय

तावून सुलाखून बाहेर
चकाकत निघते कनय
पितळ पडणारं उघडे
हवाय निश्चित निश्चय

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## निधन वार्ता



नांदेड जिल्ह्यातील लालवाडी येथील ज्येष्ठ नागरिक कै. गौतम लक्ष्मण वाघमारे यांचे दि.२ मंगळवार रोजी हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दि.२ सकाळी ९ च्या दरम्यान निधन झाले. त्यांचे मृत्यू समयी वय ७५ वर्ष होते.

त्यांच्या पश्चात पत्नी, चार मुले, तीन मुली, सून, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांच्या पार्थिव देहावर दि.२ मंगळवारी रोजी सायंकाळी ५ वाजता लालवाडी येथील त्यांच्या शेतात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. पत्रकार साहेबराव गागलवाड यांचे ते सासरे होते.

### * वाचकांचे मनोगत *

# 'गोवा' बदलतो आहे !

गोव्यासह संपूर्ण कोकण भूमीची ओळख परशुराम भूमी अशीही करण्यात येते. असे म्हणतात भगवान परशुरामांनी समुद्रात बाण मारून गोव्याची निर्मिती केली. इसवीसन पूर्व तिसऱ्या शतकापासून गोवा मौर्य साम्राज्याचा भाग बनला होता. मौर्य साम्राज्यानंतर,विविध राजवंशांनी गोव्यावर राज्य केले. ख्रिस्ताब्द १५१० मध्ये पोर्तुगीजानी गोवा जिंकले आणि पुढे ४५० वर्षे गोव्यावर राज्य केले. गोव्यावर प्रदीर्घ काळ पोर्तुगीजांची सत्ता असल्याने गोव्याच्या संस्कृतीवर आणि येथील राहणीमानावर पोर्तुगीजांचा मोठा प्रभाव जाणवतो. पोर्तुगीजांनी आपल्या सत्ताकाळात गोव्यातील हिंदूंचा अनन्वित छळ केला. तलवारीच्या बळावर मोठ्या प्रमाणात धर्मांतरे घडवून आणली. त्यांनी केलेल्या छळाच्या आणि अत्याचाराच्या खुणा आजही गोव्यात आढळतात. हिंदूंचे मोठ्या प्रमाणात धर्मांतर झाल्याने गोव्यात जागोजागी चर्च आणि ख्रिती वस्त्या पाहायला मिळतात. गोव्यात अनेक प्राचिन जागृत मंदिरे आहेत मात्र पर्यटक गोव्यात येतात ते मौजमजेसाठी, येथील समुद्र किनाऱ्यांवर बागडण्यासाठी, मद्य रिचवण्यासाठी आणि येथील कॅसिनोमध्ये जुगार खेळण्यासाठी. या सर्वांतून राज्याला भरपूर महसूल मिळत असल्याने सरकारनेही या गोष्टींना नेहमीच बळ दिले आहे. परिणामी मुळात अध्यात्मिक भूमी असलेल्या गोव्याची ओळख भोगभूमी अशी होऊ लागली. गेल्या काही महिन्यांत गोव्यात घडलेल्या काही कार्यक्रमामुळे गोव्याची अनेक वर्षांत निर्माण झालेली ओळख पुसली जाऊन ती पुन्हा एकदा योगभूमी होण्याच्या मार्गावर आहे. सनातन संस्थेला २५ वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने गोव्यात मे महिन्यात भव्यदिव्य असा सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव संपन्न झाला. यानिमित्ताने अनेक साधु संतांसह देशभरातून साधकगण गोव्यात एकवटले होते. साधुसंतांच्या आगमनाने आणि त्यांच्या चैतन्यमय मार्गदर्शनाने समस्त गोवा परिसर चैतन्याने न्हाऊन निघाला होता. अत्यंत शिस्तबद्ध रीतीने पार पडलेल्या या आनंददायी सोहळ्याने गोव्यातील स्थानिकांनाही भुरळ पाडली होती. श्रीराम जन्मभूमी अयोध्यानगरीतील प्रभू श्रीराम मंदिराचे बांधकाम पूर्ण झाल्यावर मंदिरावर ध्वजारोहणाचा नेत्रदीपक सोहळा नुकताच संपन्न झाला. त्यानंतर लगेचच गोव्यातील काणकोण तालुक्यातील श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या ५५० व्या वर्षपूर्तीच्या निमित्ताने आयोजित विशेष कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्रांच्या ७७ फुटी पूर्णाकृती मूर्तीचे अनावरण करण्यात आले. प्रभू श्रीरामचंद्रांची ही जगातील सर्वात उंच मूर्ती आहे. यानिमित्ताने मठात सिद्ध करण्यात आलेल्या रामायण थीम पार्कचेही उदघाटन करण्यात आले. गुजरातमधील स्टॅच्यू ऑफ युनिटीच्या पुतळ्याचे डिजाईन करणारे शिल्पकार राम सुतार यांनीच प्रभू श्रीरामांच्या या कांस्य मूर्तीची निर्मिती केल्याने भविष्यात ही भव्य दिव्य मूर्ती पाहण्यासाठी पर्यटक गोव्याला नक्कीच भेट देतील. प्रभू श्रीरामचंद्राच्या मूर्तीच्या रूपाने गोव्यात जणू रामराज्याचीच मुहूर्तमेढ रोवली गेली आहे. गेल्या काही वर्षांत देशभरातील अध्यात्मिक ठिकाणांना, प्राचीन मंदिरांना भेट देणाऱ्यांची संख्या वाढली आहे. तशी गोव्यातील मंदिरांत येणाऱ्या भाविकांचीही गर्दी वाढू लागली आहे. गेल्या वर्षी ऐन पर्यटनाच्या काळात गोव्यातील बीचेस ओस पडले होते. याचाच अर्थ गोव्याची ओळख हळूहळू बदलू लागली आहे. गोव्यातील हरवलेली अध्यात्मिकता पुनर्जीवित होऊ लागली आहे.


**सौ.मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई**

# चारित्र्याचा विकास घडवते तेच खरे शिक्षण!

व्यक्तीचे चारित्र्य म्हणजे तिच्या अंगी असणाऱ्या चांगल्या-वाईट गुणांची गोळाबेरीज होय. हे चारित्र्य घडवण्याचे काम औपचारिक आणि अनौपचारिक शिक्षणातून होत असते. बराचसा चारित्र्याचा विकास हा अनुकरणातूनही घडत असतो. एखाद्या शिकत असलेल्या मुलाकडून काही वाईट कृत्य घडले, तर त्याला तुला शिकवायला कोणते मास्तर आहेत? असा परखड प्रश्न विचारला जातो. समाजाची अपेक्षा असते की शिक्षणातून चारित्र्यवान, सुसंस्कृत, गुणवान आणि नैतिकतेचे अधिष्ठान असणारी पिढी घडली पाहिजे.

पाठ्यपुस्तकांमधील विविध धड्यांमधून नैतिक आचरणाचे धडे दिले जातात. अनेक महापुरुषांचे चरित्र, त्यांच्या जीवनातील प्रसंग, काल्पनिक बोधकथा तसेच इतिहास, नागरिकशास्त्र आणि समाजशास्त्र या विषयांमधूनही चारित्र्यवान विद्यार्थी घडवण्याचा प्रयत्न केला जातो.

शिक्षणातून विद्यार्थ्यांना संविधानिक जबाबदाऱ्या समजावून सांगितल्या जातात. आपल्या संस्कृतीची, सभ्यतेची आणि राष्ट्राच्या अस्मितेची जपणूक कशी करावी हे शालेय शिक्षणातून शिकवले जाते. समता, न्याय, बंधुता, धर्मनिरपेक्षता या लोकशाही मूल्यांची जपणूक विविध शालेय उपक्रमांमधून केली जाते. स्त्री-पुरुष समानतेसाठी अनुकूल वातावरण शाळेत निर्माण केले जाते. पर्यावरणाबद्दलची जाणीव आणि संरक्षणाची दृष्टीही शिक्षणातूनच



विकसित होते.समाजात अनेक अनिष्ट प्रथा आजही आढळतात. शालेय जीवनात त्यांची ओळख करून दिली जाते आणि त्या दूर करण्यासाठी आवश्यक वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित केला जातो.

शालेय अभ्यासक्रम आणि विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांच्या मनावर पुढील प्रकारची मूल्ये बिंबवली जातात

१) **नैतिक मूल्य** : नैतिक मूल्ये मुलांना सर्वांगसुंदर, सदाचारी आणि शीलसंवर्धन करणारी बनवतात. उदा. खोटे बोलू नये, चोरी करू नये, दुसऱ्यांच्या भावनांची काळजी घेऊन वागावे.

२) **सामाजिक मूल्य** : सामाजिक मूल्ये समाजासोबत सौहार्दपूर्ण संबंध ठेवण्यास मदत करतात. उदा. गरजूंना मदत करणे, प्राणिमात्रांवर दया ठेवणे, आपत्तीच्या काळात मदतीला धावून जाणे, सार्वजनिक स्वच्छतेत हातभार लावणे.

३) **आध्यात्मिक मूल्य** : आध्यात्मिक मूल्ये आत्मजाणीवा आणि आत्मविकासाला चालना देतात. उदा. ध्यानधारणा (जसे आनापान ध्यान), सकारात्मक विचार करणे.

४) **राष्ट्रीय मूल्य** : राष्ट्रीय मूल्ये देशप्रेम, राष्ट्रीय एकात्मता आणि समाजभान निर्माण करतात.

उदा. राष्ट्रगीत-राष्ट्रध्वज यांचा सन्मान करणे, राष्ट्रीय सण साजरे करून देशप्रेम जागृत करणे, देशभक्तीपर गीतांचे गायन.

५) **व्यावसायिक मूल्य** : व्यावसायिक मूल्ये कोणताही व्यवसाय नीतिमत्तेने व प्रामाणिकपणे करण्यास प्रेरित करतात.

उदा. भ्रष्टाचार न करणे, काम वेळेवर आणि नीटनेटके करणे, कुचराई न करणे.

परीक्षांमध्ये मिळणारे गुण महत्त्वाचे असले तरी विद्यार्थ्यांत मूल्यशिक्षणाची रुजवण अधिक महत्त्वाची आहे. कारण चांगले गुण यशाकडे नेतात, परंतु चांगले चारित्र्य माणसाला जीवनात कोठेच हरू देत नाहीत. म्हणूनच चारित्र्याचा विकास घडवते तेच खरे शिक्षण; आणि हाच शिक्षणाचा खरा विजय आहे!

**- किशोर जाधव,सोलापूर**
**- मो. नं. ९९२२८८२५४१**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## तालुकास्तरीय कुस्ती क्रीडा स्पर्धेत सुखेड शाळेचा डंका

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.०२, खंडाळा (सातारा) :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुखेड शाळेच्या विध्यार्थ्यांनी स्व.खाशाबा जाधव तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेसह विविध खेळात दैदीप्यमान कामगिरी करत जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी पात्र झाल्याने शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे सर्वत्र त्यांचे कौतुक होत आहे.

**स्पर्धेत यशस्वी विद्यार्थी पुढीलप्रमाणे :-**

कु.तेजल दादा धायगुडे-
३० किलो वजनी गट प्रथम,
कु.सिद्धी शशिकांत धायगुडे- प्रथम २२ किलो वजनी गट प्रथम,
अर्णव बापू धायगुडे - २५ किलो वजनी गट प्रथम तसेच
जय शशिकांत धायगुडे - २२ किलो किलो वजनी गटात द्वितीय,
अर्पिता तात्या गुलदगड - ३० किलो वजनी गटात द्वितीय,
विघ्नेश महेश पडळकर- ३५ किलो वजनी गटात तृतीय
ऋग्वेद सागर धायगुडे - तृतीय ४० किलो वजनी गटात घवघवीत यश संपादन केले.


स्वर्गीय यशवंतराव चव्हाण तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेत प्रथमेश किसन धायगुडे १०० मीटर धावणे स्पर्धेत प्रथम क्रमांक आणि सांघिक क्रीडा प्रकार केंद्र स्तरमध्ये कबड्डी द्वितीय क्रमांक,

रस्सीखेच मुली द्वितीय क्रमांक,

लंगडी मुली द्वितीय क्रमांक, लंगडी मुले द्वितीय क्रमांक असे सर्वच क्रीडा स्पर्धेत घवघवीत यश संपादन केल्याबद्दल ग्रामपंचायत सुखेड व शाळा व्यवस्थापन समिती सुखेड आणि ग्रामस्थांनी यशस्वी विद्यार्थी आणि शिक्षकांचे अभिनंदन केले.

## अे विभाग बेलापूर कार्यालय अंतर्गत अनधिकृत बांधकामावर धडक मोहिम

**अक्षराज : जे.के.पोळ**



**दि.०२, नवी मुंबई :** महापालिकेच्या अे विभाग बेलापूर कार्यालयाच्या वतीने नोटीस बजावुन देखील संबंधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे, अतिरिक्त जिल्हा न्यायालय, बेलापूर यांचे आदेशानुसार, नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ.कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने बेलापूर विभागात निष्कासनाची कारवाई केली.

उमेश माळवे, फ्लॅट नं- एच-१०१, प्लॉट नं- ३६, कुकरेजा इस्टेट, सेक्टर ११, बेलापूर, नवी मुंबई यांचे अनधिकृत बांधकामास अे विभाग बेलापूर कार्यालया मार्फत MRTP कलम ५३ (१अ) अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. त्याअनुषंगाने संबधितांनी अनधिकृत बांधकाम/ अतिक्रमण स्वत:हून हटविने आवश्यक होते. तरी सदर बांधकाम न हटविल्यामुळे दि. ०१/ १२/ २०२५ रोजी अनधिकृत पत्राशेडचे बांधकाम निष्कासीत करण्यात आले.

तसेच सदर धडक मोहिमेसाठी अे विभाग कार्यालय अंतर्गत बेलापूर विभागातील, सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी, प्रशांत नेरकर, सहा. अभियंता आत्माराम काळे व विभागातील इतर अधिकारी/ कर्मचारी उपस्थित होते. सदर मोहिमेसाठी मजूर, गॅस कटर, इत्यादी मनुष्यबळ व साधनसामग्री वापरण्यात आली. तसेच अतिक्रमण विभागातील पोलिस अधिकारी/ कर्मचारी व सुरक्षारक्षक उपस्थित होते. यापुढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र करण्यात येणार आहे.

## महापरिनिर्वाणदिनाच्या पूर्वतयारीचा कोकण विभागीय आयुक्तांनी घेतला आढावा

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०१, मुंबई :** भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त चैत्यभूमी येथे लाखो अनुयायी अभिवादन करण्यासाठी येत असतात. या अनुयायांना पुरविण्यात येणाऱ्या आवश्यक सोयी- सुविधांच्या पूर्वतयारीचा आढावा कोकण विभागीय आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी घेतला.कोकण विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त करावयाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा बैठक मुंबई शहर जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे घेण्यात आली. बैठकीस मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, कोकण विभाग अपर आयुक्त फरोग मुकादम, डॉ.बाबासाहेब आंबेडकरमहापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे यांच्यासह विविध संघटनांचे प्रतिनिधी तसेच संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.विभागीय आयुक्त डॉ.विजय सूर्यवंशी म्हणाले, महापरिनिर्वाण दिनानिमित्त प्रत्येक विभागाने आपल्याला दिलेली जबाबदारी यशस्वीरित्या पार पाडावी. चैत्यभूमी परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये या दृष्टीकोनातून पोलीस बंदोबस्त याबाबत काटेकोर नियोजन करण्यात यावे, असे निर्देश दिले.चैत्यभूमी परिसरातील स्वच्छता, साफसफाई याबाबत संबंधित यंत्रणांनी काटेकोरपणे जबाबदारी पार पाडावी असेही निर्देश त्यांनी यावेळी दिले. बैठकीत नियंत्रण कक्ष, आरोग्यसेवा, रुग्णवाहिका, रेल्वे व्यवस्था, बेस्ट आणि एसटी परिवहन व्यवस्था, पिण्याचे पाणी, भोजन व्यवस्था, सीसीटीव्ही देखरेख, पोलीस बंदोबस्त तसेच वाहतूक नियोजन या संदर्भातही विभागीय आयुक्तांनी निर्देश दिले. बैठकीस कोकण विभागातील सर्व जिल्हाधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी बजावला मतदानाचा हक्क

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, बुलढाणा :** नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीसाठी आज सकाळी जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांनी प्रभाग क्रमांक १० मधील सरस्वती विद्यालयातील मतदान केंद्रावर भेट देत इतर मतदारांप्रमाणे रांगेत उभे राहून मतदानाचा हक्क बजावला. मतदानानंतर त्यांनी नागरिकांना लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी निर्भयपणे, पारदर्शकपणे आणि उत्साहाने मतदान करण्याचे आवाहन केले. मतदानाचा हक्क बजावताना कोणतीही चूक, गैरप्रकार किंवा बनावटपणा करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येईल, असा कडक इशाराही दिला. जिल्हाधिकारी पाटील यांनी सांगितले की, प्रशासनाच्या वतीने मतदान प्रक्रिया शांततेत, सुव्यवस्थित आणि सुरळीत पार पाडण्यासाठी सर्व आवश्यक तयारी पूर्ण करण्यात आली आहे. त्यांनी सर्व नागरिकांना लोकशाही प्रक्रियेत सक्रिय सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले.

# पारनेर तालुक्यात बिबट्याची दहशत संपेना

## बिबट्याच्या हल्ल्यात ७० वर्षीय महिलेचा मृत्यू; शेळ्यांचा पाडला फडशा

**अक्षराज : वसंत रांधवन**

**दि.०२, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यात दररोज बिबट्याकडून पशुधनाच्या शिकारीच्या घटना घडतच आहेत. बिबट्यांच्या वावर दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे. किन्ही गावच्या शिवारात मंगळवार, दि.०२ डिसेंबर २०२५ रोजी सुमारे ४ वाजता बिबट्याच्या हल्ल्याची गंभीर घटना घडली आहे. शेतात काम करत असताना बिबट्याच्या हल्ल्यात एका वृद्ध महिलेचा जागीच मृत्यू झाला. मयत महिलेचे नाव भागूबाई विश्वनाथ खोडदे (वय ७०, रा.किन्ही, ता.पारनेर) असे आहे.

प्रत्यक्षदर्शींनी सांगितले की, भागूबाई या आपल्या शेतात एकट्याच काम करत होत्या. अचानक बिबट्याने त्यांच्यावर हल्ला केला. हल्ल्याची तीव्रता इतकी होती की, त्यांना वाचवण्यासाठी कोणीही पोहोचू शकले नाही आणि



जागीच त्यांचा मृत्यू झाला. ग्रामस्थांनी आरडाओरड केल्यावर बिबट्या जंगलाकडे पळाला. या घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून मृतदेह शवचिकित्सेसाठी पारनेर ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आला. याप्रकरणी पारनेर पोलिसांत आकस्मात मृत्यूची नोंद झाली.

तालुक्यातील वडगाव सावताळ येथे दिनांक २९ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास बिबट्याने धुमाकूळ घातला. रावसाहेब भीमाजी भोबाळ यांच्या तीन शेळ्यांना बिबट्याने ठार मारले. अचानक हल्ला केल्यामुळे शेतकरी वर्गामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. घटनेची माहिती मिळताच वनविभागाचे अधिकारी सचिन गांगुर्डे व कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले व पंचनामा केला.

किन्ही व वडगाव सावताळ, टाकळी ढोकेश्वर सुपे परिसरात गेल्या काही महिन्यांपासून बिबट्याच्या हालचाली वाढल्याचे सांगितले जात आहे. यापूर्वीही जनावरे मारण्याच्या घटना घडल्या आहेत. या घटनेमुळे परिसरात दहशत पसरली असून ग्रामस्थांनी वन विभागाकडे तात्काळ बिबट्या पकडण्याची मागणी केली आहे.


वडगाव सावताळ येथील वनक्षेत्र गावालगत असल्याने या परिसरात वन्यप्राण्यांचा मुक्त संचार आढळतो. किन्ही गावच्या शिवारात डोंगरांमध्ये यापूर्वी देखील बिबट्यांचा वावर अनेक वेळेस आढळून आला आहे. टाकळी ढोकेश्वर परिसरातील वारंवार बिबट्याने दर्शन दिले आहे. बहिरोबाचीवाडी, पिंपळगाव तुर्क, करंडी, गोरेगाव, काकणेवाडी, निवडुंगेवाडी ढोकी या परिसरात मोठ्या प्रमाणात डोंगररांगा आहेत. त्यामुळे हा परिसर वन्यप्राण्यांना आकर्षित करत असतो. तालुक्यात दररोज शेतकऱ्यांच्या पशुधनाच्या शिकारीच्या घटना घडत असल्याने शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण बनले आहे. तसेच बिबट्याच्या दहशतीमुळे शेतात काम करण्यासही शेतकरी तसेच मजुरांना भीतीचे वातावरण तयार झाले आहे. संपूर्ण तालुका बिबट्याच्या दहशतीखाली आला असून विद्यार्थी, लहान बालके, नागरिक, शेतकरी भयभीत झालेले आहेत.

## वरवंटी येथे श्री दत्त जन्मोत्सवानिमित्त गुरुचरित्र पारायण, कीर्तन महोत्सवास प्रारंभ

**अक्षराज : संगीता वनकळस**

**दि.०२, धाराशिव :** तालुक्यातील वरवंटी येथे श्री दत्त जन्मोत्सवानिमित्त त्रिदिवसीय हरिकीर्तन गुरुचरित्र पारायण व हरिभजन कार्यक्रमाचे दि.०२ ते ०४ डिसेंबर या कालावधीत आयोजन करण्यात आले आहे. गावातील श्री दत्त मंदिरात या सोहळ्यास मंगळवारी (दि.०२) भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला.

यानिमित्त सायंकाळी५ वाजता श्री दत्त पालखी दिंडी प्रदक्षिणा झाली. रात्री हभप प्रमोद माने महाराज अनसुर्डेकर यांची कीर्तनसेवा झाली. त्यानंतर पंचक्रोशीतील भजनी मंडळाचा हरिजागर असे कार्यक्रम झाले.बुधवार, दि. ३ डिसेंबर रोजी दुपारी बालाजीनगर धाराशिव येथील महिला मंडळाची



भजनसेवा तर रात्री ९ वाजता हभप अभिमन्यू महाराज घाडगे खुणेश्वर यांची कीर्तनसेवा होत आहे. त्यानंतर भजनी मंडळाच्या वतीने हरिजागर करण्यात येणार आहे.गुरूवार, दि. ४ डिसेंबर रोजी दुपारी वरवंटी व परिसरातील महिला मंडळाची भजनसेवा होणार आहे. सायंकाळी ४ वाजता हभप अ‍ॅड. पांडुरंग लोमटे महाराज यांचे गुलालाचे कीर्तन होईल. त्यानंतर वैभव मोहन उंबरे यांच्या वतीने महाप्रसाद होणार आहे.

पारायण सोहळ्यात परमेश्वर सगर, गोरोबा दंडनाईक, अंकुश देशमुख, नागेश देशमुख यांच्या वतीने अन्नदान सेवा करण्यात येत आहे. तर तीन दिवस फराळ (फलाहार) उद्धव डोंगरे, रूद्राप्पा बेंद्रे, श्रीमंत पवार, चहापान बाळासाहेब देशमुख, पृथ्वीराज सगर, शहाजी बागल, यांच्यातर्फे करण्यात येत आहे.

पारायण सोहळ्यानिमित्त मंदिरावर छत्रपती जमदाडे यांच्या वतीने आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. व्यासपीठ चालक ह.भ.प प्रणिताताई विजयकुमार देशमुख या असून अधिक माहितीसाठी दत्तसेवक दत्तात्रय पंडित व दिनकर देशमुख यांच्याशी संपर्क साधावा.

या सोहळ्यात वरवंटीसह पंचक्रोशीतील वडगाव (सि.), बावी, खामसवाडी, शेरकर वाडगा, केशेगाव, धारूर, अनसुर्डा, पळसवाडी, कामठा, ढेकरी, केकस्थळवाडी, आपसिंगा, शिराढोण, आळजापूर, मिर्झनपूर, भालगाव, उपळे (दु), बेगडा, सुडी, पिंपरी, कात्री पोहनेर, सांजा, गावसूद, देवळाली, उतमी कायापूर, राघुचीवाडी, जुनोनी येथील भजनी मंडळाचा सहभाग असल्याचे असून या सोहळ्याचा भाविकांनी लाभ घ्यावा, असे आयोजक समस्त वरवंटी ग्रामस्थांच्या वतीने कळविण्यात आले आहे.

## पनवेल मनपातर्फे जागतिक दिव्यांग दिनानिमित्त विशेष कार्यक्रम

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.०२, पनवेल :** महानगरपालिका दिव्यांग कल्याण विभागातर्फे जागतिक दिव्यांग दिनाचे औचित्य साधून दिनांक ०३ डिसेंबर २०२५ रोजी विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम कळंबोली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन येथे सकाळी १० ते दुपारी ५ वाजेपर्यंत होणार आहे. महानगरपालिकेकडून दिव्यांग बांधवांसाठी घेण्यात येणाऱ्या या कार्यक्रमामध्ये आरोग्य शिबीर, आयुष्मान कार्ड वाटप, प्रेरणादायी मार्गदर्शन, मनोरंजनात्मक सहभागात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे.

दिव्यांग बांधवाचा आत्मविश्वास वाढावा, समाजात सन्मानाने जगण्यास प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळावे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे दिव्यांग विभागाचे उपायुक्त रवीकिरण घोडके यांनी सांगितले आहे.

महापालिका नेहमीच दिव्यांग बांधवांच्या योजनांची अमंलबजावणी करण्यासाठी तत्पर राहिली आहे. याच बरोबर महापालिकेच्यावतीने दिव्यांग बांधवाच्या घरोघरी जाऊन सर्वेक्षण करून नोंदणी केली जात आहे. अशा प्रकारे नोंदणी करणारी पनवेल महापालिका ही राज्यातील पहिली महापालिका आहे. अशाच पध्दतीने येत्या काळात दिव्यांग बांधवासाठी विविध योजना महापालिकेच्यावतीने राबविण्यात येत आहेत.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त आयोजित केलेल्या या विशेष कार्यक्रमास पालिका कार्यक्षेत्रातील जास्तीत जास्त दिव्यांग बांधवांनी उपस्थित रहावे असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

**दिव्यांग कल्याण विभागा अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना :-**

१) पनवेल महानगरपालिका हद्दीतील दिव्यांग बांधवांची पनवेल महानगरपालिकेमध्ये नोंदणी करणे. दिव्यांगांच्या गरजेनुसार त्यांना उदरनिर्वाह/ व्यवसाय/ साहित्य खरेदी करण्याकरीता निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (NEFT/RTGS) द्वारे जमा केले जातात. २) एकूण ३० कृष्ठरोगी बांधवांना औषधी उपचारासाठी प्रती महिना रु.४,०००/- वैद्यकीय सहाय्य व उदरनिर्वाह निधी थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात (NEFT/RTGS) द्वारे जमा केले जातात.३) दिव्यांग व्यक्तीच्या विवाहाकरिता अर्थसहाय्य देण्यात येते. (फक्त एकदाच) एक व्यक्ती दिव्यांग असल्यास रु. २५,०००/- दोन व्यक्ती दिव्यांग असल्यास रु.४०,०००/-४) दिव्यांग विद्यार्थ्यांना व्यवसायिक / पदवीत्तर शिक्षणासाठी वैद्यकीय, अभियांत्रिकी, पी.एच.डी. व एम.बी.ए असे शिक्षण घेत असलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु.२५,०००/- शिष्यवृत्ती स्वरुपात देण्याची योजना राबविण्यात येते. (फक्त एकदाच)५) अतिनीव्र (बिछान्याला खिळलेला) दिव्यांग बांधवांस मासिक पेन्शन देण्यात येते. (प्रति महा रक्कम रु. ३,०००/-)६) दिव्यांग बांधवांचे घरोघरी जाऊन सर्वेक्षण करणेबाबतची योजना सुरू आहे.

## पनवेल महानगरपालिकेच्या वतीने लायन्स उद्यानाचे नुतनीकरण

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, पनवेल :** पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक उद्याने अधिक सुंदर, सुरक्षित आणि नागरिकांसाठी उपयुक्त करण्याच्या उद्देशाने महानगरपालिकेमार्फत ठाणेनाका रोडवरील लायन्स उद्यानाचे नूतनीकरण व सुशोभीकरण करण्यात आले आहे. महानगरपालिकेचे आयुक्त मा. मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार आणि उपआयुक्त नानासाहेब कामठे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ पनवेल – सुंदर पनवेल करण्याच्या दृष्टीने उद्यान विभागाच्या वतीने ठाणेनाका





रोडवरील लायन्स उद्यानाचे नुतनीकरण करण्यात आले आहे. उद्यानाच्या नुतीनकरणामध्ये उद्यानामध्ये नवीन आकर्षक प्रकाशयोजना करण्यात आली आहे. त्यामुळे रात्रीही उद्यान पाहण्यास सुंदर आणि सुरक्षित बनले असून नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

उद्यानाच्या नुतनीकरणाची सर्व कामे सहायक आयुक्त डॉ. रुपाली माने आणि उद्यान विभाग प्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान पर्यवेक्षक सिद्धार्थ कांबळे, कनिष्ठ अभियंता साकेत पाटील तसेच सहाय्यक पर्यवेक्षक अशोक मुने, किरण गायकवाड व गजलक्ष्मी आंबे यांच्या सहकार्याने पार पडली. पनवेल महानगरपालिकेने पुढील काळात शहरातील इतर उद्यानांचेही सुधारणा व सौंदर्यीकरण करण्याची योजना हाती घेतली आहे. नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित आणि आधुनिक, सार्वजनिक सुविधा उपलब्ध करून देण्याचा महापालिकेचा संकल्प असल्याचे उपायुक्त नानासाहेब कामठे यांनी सांगितले आहे.

# चालू वर्षाच्या मागणीसह थकीत पाणी बिल भरणा करणाऱ्या नागरिकांना प्रशासकीय आकारामध्ये १०० टक्के सूट

**अक्षराज : तानाजी ताकतोडे**

**दि.०२, ठाणे :** ठाणे महापालिका कार्यक्षेत्रातील घरगुती वापरासाठी असलेल्या नळसंयोजनाचे थकीत देयक चालू वर्षाच्या मागणीसह एक रकमी भरणा केल्यास प्रशासकीय आकारामध्ये (दंड / व्याज) १०० टक्के सूट लागू करण्यात आली असल्याची माहिती महापालिका आयुक्त तथा प्रशासक सौरभ राव यांनी आज दिली.

थकीत पाणीपट्टी बिलावर १०० टक्के इतकी भरीव सवलत जाहिर करण्यात आल्याने नागरिकांना आर्थिक दिलासा मिळणार असून या योजनेचा लाभ नागरिकांनी घ्यावा असे आवाहन आयुक्तांनी केले आहे.

ठाणे महापालिकेने पाणीपट्टी वसुलीची मोहिम हाती घेतली असून जे नागरिक पाणापट्टी भरणार नाही अशा थकीत बिलधारकांचे नळसंयोजन खंडित करण्याची कारवाई करण्यात येणार आहे, तरी नागरिकांनी पाणीपट्टी भरुन महापालिकेस सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त सोरभ राव यांनी केले आहे. सदर योजना दि. १ डिसेंबर २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत लागू राहील. वरील योजनेचा लाभ घेऊन थकीत व चालू पाणी देयकाची रक्कम पूर्णपणे भरुन त्यावरील प्रशासकीय आकाराम ध्ये (दंड / व्याज)१०० टक्के सूट / सवलत योजनेचा लाभ नागरिक घेवू



शकतील. या धोरणात्मक निर्णयापूर्वी ज्या घरगुती पाणी बील धारकांनी पाणी पुरवठा देयके जमा केली असतील अशांना सदरची सवलत योजना लागू असणार नाही. तसेच ही योजना व्यवसायिक संयोजन धारकांना लागू असणार नाही.

जे नागरिक दि.३१/०३/२०२६ आपली थकबाकीची रक्कम प्रलंबित ठेवतील अशा खातेदारांवर जप्ती कारवाई तात्काळ प्रस्तावित करुन नळ संयोजन खंडीत करणे, मिटर रुम सिल करणे व पंप जप्ती अशी कारवाई होईल असे आयुक्त यांनी यावेळी नमूद केले. या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावधी होणेसाठी प्रभाग समिती स्तरावर माहिती फलक लावण्यात यावेत व सदर योजना प्रभावीपणे राबवावी अशी सूचना आयुक्तांनी केली आहे.

या योजनेचा लाभ जास्तीत नागरिकांनी घ्यावा असे आवाहन महापालिका आयुक्त सौरभ राव यांनी केले आहे.

# आर्य प्रतिष्ठानतर्फे मोफत नेत्र तपासणी शिबिर संपन्न

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०२, सोलापूर :** आर्य प्रतिष्ठान यांच्या वतीने रविवारी जुळे सोलापूर येथे मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत घेण्यात आलेल्या या शिबिराचा तब्बल १२० रुग्णांनी लाभ घेतला.

या शिबिरामध्ये नेत्र चिकित्सक श्रेयस भोसले यांनी रुग्णांची तपासणी करून डोळ्यांचे नंबर काढणे, विविध डोळ्यांचे आजार ओळखणे तसेच डोळ्यांच्या निगेबाबत मार्गदर्शन केले. डोळ्यांविषयी जागृती करताना योग्य उपचार, दैनंदिन काळजी आणि आरोग्यदायी सवयींचे महत्त्व स्पष्ट केले.

तपासणीदरम्यान ऑपरेशन आवश्यक असलेल्या रुग्णांना भोसले यांनी मोफत रेफर केले. तसेच नेत्रशस्त्रक्रियेसंदर्भात सविस्तर सल्लाही देण्यात आला.

शिबिराचे नियोजन आर्य प्रतिष्ठान



व श्रेयस भोसले यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. आर्य प्रतिष्ठानचे कार्यालय शिव मल्हार अपार्टमेंट, जुळे सोलापूर येथे हे शिबिर पार पडले.

मोफत नेत्र तपासणीमुळे सर्वसामान्य रुग्णांना डोळ्यांची योग्य काळजी घेण्याबाबत महत्त्वपूर्ण मार्गदर्शन मिळाले. यापुढेही अशा उपक्रमांचे आयोजन करून समाज आरोग्य जपण्यास मदत केली जाईल, असे आयोजकांकडून सांगण्यात आले.

# दिल्लीकर खवय्यांसाठी मराठमोळी मेजवानी...

## महाराष्ट्र सदन येथे १२ ते १४ डिसेंबर दरम्यान महाराष्ट्र खाद्य महोत्सवाचे आयोजन

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, नवी दिल्ली :** महाराष्ट्राच्या खमंग खाद्य पदार्थांचा आस्वाद दिल्लीकरांना मिळावा या उद्देशाने राजधानी दिल्ली येथील महाराष्ट्र सदनात महाराष्ट्र खाद्य महोत्सवाचे आयोजन दि. १२ ते १४ डिसेंबर २०२५ दरम्यान करण्यात आले असल्याची माहिती महाराष्ट्र सदनाच्या निवासी आयुक्त आणि सचिव आर विमला यांनी दिली.

कस्तुरबा मार्गांवरील महाराष्ट्र सदनात आयोजित या महोत्सवात महाराष्ट्राच्या विविध प्रादेशिक खाद्यसंस्कृतीचा आणि कलेचा संगम पाहायला मिळणार आहे.नवरसांनी पूर्ण अशा चवदार पदार्थांची रेलचेल दिल्लीकरांना या निमित्ताने अनुभवायला मिळणार आहे.

**प्रसिद्ध शेफ विष्णू मनोहर यांच्या हस्ते उद्घाटन**

**• पाककृतींची मेजवानी...**

या खाद्य महोत्सवाचे उद्घाटन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय शेफ विष्णू मनोहर यांच्या हस्ते होणार आहे. खाद्य महोत्सवामध्ये महाराष्ट्रातील विविध भागांतील वैशिष्ट्यपूर्ण पदार्थ उपलब्ध असतील. नागपूर विभागातील सावजी चिकन किंवा मटण रस्सा, तार्री पोहा आणि संत्री-आधारित मिठाई; पुणे भागातील मिसळ पाव, वडा पाव आणि पुरण पोळी; जळगावातील शेव भाजी, भरित (वांग्याचे भरित) आणि केळीशी संबंधित पदार्थ; मालवणातील



मालवणी सीफूड, कोंबडी वडे आणि सोल कढी; औरंगाबाद मधील नान कालिया, डालिंबी उसळ आणि स्थानिक बिर्याणी; तसेच कोल्हापुरी नॉन-व्हेजमधील तांबडा रस्सा, पांढरा रस्सा आणि कोल्हापुरी चिकन किंवा मटण यांचा समावेश असेल. हे पदार्थ महाराष्ट्राच्या समृद्ध पाककृती परंपरेचे प्रतिनिधित्व करतील.

या खाद्य महोत्सवात सातारा, कोल्हापूर, जळगाव,पुणे अमरावती, रायगड या जिल्ह्यातील जिल्हा परिषदेतर्गत असलेले महिला स्वयंम सहायता समूह सहभागी होणार असून त्यांच्याकडील रुचकर पदार्थांचा देखील गरमागरम आस्वाद घेता येणार आहे.

**सांस्कृतिक कार्यक्रम आणि बालकांसाठी विशेष आकर्षण...**

हा महोत्सव केवळ खाद्यपदार्थांपुरता मर्यादित नसून, महाराष्ट्राची समृद्ध कला आणि संस्कृती दर्शवणारे विविध सांस्कृतिक कार्यक्रमही आयोजित करण्यात आले आहेत.लहान मुलांसाठी खास आकर्षण म्हणून 'करमणूकीचे'चे खेळ आणि जादूचे विस्मयकारक प्रयोग ठेवण्यात आले आहेत. ज्यामुळे कुटुंबातील सर्व सदस्यांना या महोत्सवाचा आनंद घेता येईल.

**महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ स्टॉलद्वारे पर्यटन स्थळांचे दर्शन...**

या महोत्सवात महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचा विशेष माहिती स्टॉल देखील असणार आहे. या स्टॉलद्वारे महाराष्ट्रातील ऐतिहासिक, धार्मिक आणि नैसर्गिक पर्यटन स्थळांची माहिती देण्यात येईल. पर्यटन स्थळांच्या माहितीपत्रकांचे वितरण करून महाराष्ट्राच्या पर्यटनाला अधिकाधिक चालना देण्याचा मानस असल्याचे श्रीमती विमला यांनी यावेळी सांगितले.

महाराष्ट्राच्या अस्सल चवीचा संस्कृतीचा, पर्यटनाचा अनुभव घेण्यासाठी दिल्लीतील नागरिकांनी या तीन दिवसीय खाद्य महोत्सवाला मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीमती विमला यांनी केले आहे.

# सफाई कामगार आणि वाहनचालक यांच्या न्यायहक्कासाठी श्रमजीवी कामगार संघटनेचे

## गुरुवारी थेट पालिकेवर बेमुदत आंदोलन...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०३, कल्याण (ठाणे) :** कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत कार्यरत सफाई कामगार व वाहन चालकांच्या मूलभूत हक्कांकडे सातत्याने दुर्लक्ष केले जात असल्याचा गंभीर आरोप श्रमजीवी कामगार संघटनेने केला आहे. यासंदर्भात संघटनेतर्फे गुरुवार, ४ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता केडीएमसी मुख्यालयासमोर बेमुदत आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

महानगर स्वच्छ ठेवण्यासाठी दिवस-रात्र राबणाऱ्या कामगारांना कामगार कायद्यानुसार मिळायला हवी ती सुरक्षा, सुविधा आणि मानधन मिळत नसल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. काही सफाई कामगारांना नवीन ठेकेदाराने अजूनही कामावर घेतलेले नाही.




पालिकेचे बऱ्याच वर्षापासून काम करून सुद्धा त्यांच्यासोबत त्यांच्या कुटुंबियांवर उपासमारीची वेळ आलेली आहे.

कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी इथे तिथे रोजंदारी काम करत हिंडण्याची वेळ ठेकेदारांमुळे आलेली आहे. अनेकांना किमान वेतन सुद्धा मिळत नाही, पगारात तफावत ठेवली जाते, अत्याधिक काम करून घेतले जाते तरी ओव्हरटाईमचा मोबदला दिला जात नाही.

सुट्टीच्या दिवशी काम करूनही वेगळे मानधन नाही, तर काहींना अचानक कामावरून कमी करण्याच्या घटना सुरूच आहेत.

पगारात तफावत, PF, ESIC, नियुक्तीपत्र यांसारख्या मूलभूत हक्कांची अंमलबजावणीही होत नसून कामाच्या ठिकाणी वैद्यकीय सुविधा, हेल्थ इन्शुरन्स आणि सुरक्षा साधने पुरवण्यात प्रशासन अपयशी ठरले असल्याचे संघटनेचे आरोप. कामगारांवरील वाढते अत्याचार, दुर्लक्ष आणि अन्याय संपेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा निर्धार संघटनेने व्यक्त केला आहे. कामगारांच्या हक्कासाठी लढा सुरू आहे. सर्व कामगारांनी आंदोलनात सहभागी होऊन आपला आवाज बुलंद करावा असे आवाहन संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# थोडक्यात

## हाफकिनमध्ये इथिओपियन शिष्टमंडळाला लस विश्लेषण प्रशिक्षण

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१, मुंबई :** संयुक्त राष्ट्रांच्या प्रकल्प सेवा कार्यालयाने (यूएनओपीएस) मेसर्स टेकइन्व्हेन्शन लाइफकेअर मार्फत इथिओपियातील सार्वजनिक आरोग्य अधिकारी आणि लस तज्ञांचे शिष्टमंडळ परळ येथील हाफकिन शिक्षण, संशोधन आणि चाचणी संस्थेला लस विश्लेषणावरील विशेष प्रशिक्षणाकरिता भेट दिली. या उपक्रमाचा उद्देश दोन्ही देशांमधील आरोग्य क्षेत्रातील द्विपक्षीय सहकार्य वृद्धिंगत करणे हा आहे.इथिओपियाच्या सार्वजनिक आरोग्य मंत्रालयाचे वरिष्ठ सल्लागार हैलू अशेनाफी डेनिसे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाचे स्वागत हाफकिन संस्थेच्या संचालिका डॉ. सुवर्णा खरात यांनी केले.

त्यांनी संस्थेतील संशोधन उपक्रम, नवोन्मेषी प्रकल्प आणि भविष्यातील संयुक्त सहकार्याच्या संधींबाबत सविस्तर माहिती दिली.प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालक तसेच महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अजय चंदनवाले आणि हाफकिन जैव औषध निर्माण महामंडळाचे महाव्यवस्थापकीय संचालक सुनील महेंद्रकर यांच्या हस्ते झाले. डॉ. चंदनवाले यांनी दोन्ही देशांमध्ये संयुक्त संशोधन आणि नावीन्यपूर्ण प्रकल्प राबविण्याबाबत प्रस्ताव मांडला. महेंद्रकर यांनी या सहकार्यामुळे आरोग्य क्षेत्रात नवीन संधी उपलब्ध होतील, असे नमूद केले.शिष्टमंडळाने परळ येथील ओरल पोलिओ लस उत्पादन केंद्राला भेट देऊन कार्यपद्धतीची माहिती घेतली. ९ डिसेंबर पर्यंत हा उपक्रम असून प्रशिक्षणादरम्यान विषाणूशास्त्र आणि सेल बायोलॉजी विभागाच्या सहायक संचालिका डॉ.उषा पद्मनाभन यांच्या नेतृत्वाखालील तज्ञ पथक शिष्टमंडळाला मार्गदर्शन करणार आहे. भारत-इथिओपिया आरोग्य सहकार्य अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीने हे पाऊल अत्यंत महत्त्वपूर्ण ठरत असून स्थिरता, प्रगती आणि परस्पर विकासाच्या उद्दिष्टांना अधिक बळ मिळणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

## ओजस कॉलेज ऑफ फिसिओथेरपीमध्ये नवीन विद्यार्थी स्वागत समारंभ उत्सहात संपन्न

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०१, जालना :** आज ओजस कॉलेज ऑफ फिसिओथेरपीमध्ये नवीन विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी



म्हणून भागवत शिंदे,विजय जऱ्हाड,प्राचार्य के.के.सिंग उपस्थित होते. यावेळी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. दिप प्रज्वलन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. मुख्याध्यापक यांनी सर्व विद्यार्थ्यांचे स्वागत करून फिसिओथेरपीचे महत्व समजावून सांगितले.

प्राध्यापिका निधी शर्मा यांनी मनोगत व्यक्त करून कॉलेजची नियमावली व प्रमुख परीक्षाबद्दल माहिती दिली. संध्या शेंडगे व जयदीप शिवले यांनी दैनंदिन जीवनात फिसिओथेरपीचे महत्व याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती दिली. सर्व नवीन विद्यार्थ्यांचा सत्कार करून स्वागत करण्यात आले. अर्जुन मेटकर याने मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाला प्राध्यापक राम अवतार, निधी जयस्वाल, शुभांगी मुकंद, गायत्री कलंत्री, अमर दामले हे उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कृपा बेहेरे व त्रिवेणी राठोड यांनी केले तर ग्लोरी पटारे हिने आभार व्यक्त केले.

## महाराष्ट्रातील 'या' महत्त्वाच्या जिल्ह्यात म्हाडाची बंपर लॉटरी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०२, नाशिक :** म्हाडाच्या नाशिक मंडळातर्फे नाशिक शहरातील गृहनिर्माण प्रकल्पांमधील ४०२ घरे आगाऊ अंशदान तत्त्वावर विकण्यासाठी लॉटरी काढण्यात आली आहे. या घरांची किंमत १४ लाख ९४ हजार २३ रुपयांपासून ते ३६ लाख ७५ हजार २३ रुपयांपर्यंत



आहे. वांद्रे मुख्यालयात 'म्हाडा'चे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांच्या हस्ते ऑनलाइन अर्ज नोंदणीला सुरुवात झाली. २०२५ मध्ये नाशिक मंडळाने यापूर्वी तीन लॉटरीद्वारे ८४६ घरे विकली आहेत आणि ही चौथी लॉटरी परवडणारी घरे उपलब्ध करून देण्यासाठी आहे. या लॉटरीतील घरांची विक्री किंमत पाच टप्प्यांमध्ये भरता येणार आहे. अर्जदारांना १ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीतील उत्पन्नाचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे. अर्जदाराचे आयकर विवरणपत्र अथवा तहसील कार्यालयाचे उत्पन्न प्रमाणपत्र यापैकी एक उत्पन्न पुरावा ग्राह्य धरला जाईल. 'म्हाडा'च्या नाशिक मंडळातर्फे नाशिक शहरातील चुंचाळे, पाथर्डी, मखमलाबाद, आडगाव, सातपूर शिवारात असलेल्या विविध गृहनिर्माण प्रकल्पांमधील ४०२ घरे आगाऊ अंशदान तत्त्वावर विकण्यासाठी लॉटरी काढली जाणार आहे. या घरांच्या किमती १४ लाख ९४ हजार २३ रुपये ते ३६ लाख ७५ हजार २३ रुपयांदरम्यान आहेत.

म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांनी सोमवारी वांद्रे येथील मुख्यालयात या लॉटरीसाठी ऑनलाइन अर्ज स्वीकारण्यास सुरुवात केली. त्यांनी सांगितले की, २०२५ मध्ये नाशिक मंडळाच्या माध्यमातून यापूर्वी तीन लॉटरीद्वारे ८४६ घरे विक्रीसाठी दिली गेली आहेत. ही चौथी लॉटरी असून, सर्वसामान्यांसाठी परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याचा म्हाडाचा प्रयत्न आहे. अल्प उत्पन्न गटातील नागरिकांसाठी चुंचाळे शिवारात १३८ घरं लॉटरीमध्ये आहेत. पाथर्डी शिवारात ३० घरं, मखमलाबाद शिवारात ४८ घरं आणि आडगाव शिवारात ७७ घरं या गटासाठी उपलब्ध आहेत. या सर्व घरांची मिळून एकूण २९३ घरं लॉटरीसाठी निश्चित करण्यात आली आहेत. मध्यम उत्पन्न गटासाठी देखील घरं विक्रीसाठी सज्ज आहेत. सातपूर शिवारात ४० घरं, पाथर्डी शिवारात ३५ घरं आणि आडगाव शिवारात ३४ घरं या गटासाठी आहेत. या तिन्ही ठिकाणच्या घरांची बेरीज १०९ होते. त्यामुळे मध्यम उत्पन्न गटातील लोकांनाही घरं घेता येणार आहेत.

**कोणती कागदप्रत्रे आवश्यक?**

१ एप्रिल २०२४ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीतील उत्पन्नाचा पुरावा सादर करावा लागेल. आयकर विवरणपत्र किंवा तहसील कार्यालयाचे उत्पन्न प्रमाणपत्र यापैकी एक ग्राह्य धरले जाईल. या लॉटरीमुळे हजारो कुटुंबांना स्वतःचे घर मिळण्याची संधी आहे. विजेत्यांना घरांच्या किमती भरण्यासाठी हप्ते पद्धतीचा लाभ घेता येईल.